# अमर हिंद मंडळ™, दादर

**अमरवाडी, गोखले रोड (उत्तर), दादर, मुंबई - ४०००२८ स्थापना : २६ जानेवारी १९४७**
**सार्वजनिक विश्वस्त नोंद क्रमांक एफ ४३ मुंबई,**
**संस्था विधी नोंदणी क्रमांक १७८६ / २५६ - १९४९**
www.amarhindmandal.com / amarhindmandal@rediffmail.com


प्रति,
माननीय श्री. / श्रीमती
तहहयात सभासद
अमर हिंद मंडळ, दादर

सप्रेम नमस्कार,

अमर हिंद मंडळ, दादर या ७८ वर्षाच्या संस्थेचे आपण आजीव/तहहयात सभासद आहात याचा तुम्हाला व आम्हांला अभिमानच आहे. गेली ७८ वर्षे कार्यरत असलेल्या हया संस्थेची त्रैवार्षिक निवडणूक रविवार दि. १० ऑगस्ट २०२५ रोजी मंडळाच्या सभागृहात सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत होणार आहे. त्या संबंधीचे सविस्तर पत्र सोबत जोडत आहोत. त्यात सर्व माहिती दिलेली आहेच. त्याच दिवशी दुपारी २.३० वाजता मंडळाच्या सभागृहात ७८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित केली आहे. त्याहून अधिक काही माहिती हवी असल्यास मंडळाच्या कार्यालयात सायं. ६ ते ८ या वेळेत संपर्क करावा अथवा व्यक्तिश: कार्यवाहांशी संपर्क साधावा.

वार्षिक अहवाल मंडळाच्या कार्यालयात शुक्रवार दि. २५ जुलै २०२५ (रविवार सोडून) पासून संध्याकाळी ६ ते ८ या वेळेत आपणांस घेऊन जाण्यासाठी उपलब्ध असेल. तसेच मंडळाच्या वेबसाईटवर हा अहवाल आपण पाहू शकाल (www.amarhindmandal.com) मतदानाला येताना वैध ओळखपत्र सोबत घेऊन येणे आवश्यक आहे.

आपली नम्र

सीमा कोल्हटकर
प्रमुख कार्यवाह

**विशेष सूचना** – निवडणूक अर्ज पद संख्येपेक्षा अधिक आले तरच निवडणूकीसाठी मतदान होईल याची नोंद घ्यावी.

# अमर हिंद मंडळ

**अमरवाडी, गोखले रोड उ, दादर, मुंबई - ४०००२८**

**स्थापना :- २६ जानेवारी १९४७**

**सार्वजनिक विश्वस्त नोंद क्रमांक एफ ४३ मुंबई, संस्था विधी नोंद क्रमांक १७८६ / २५६ - १९४९**

**निवडणूकीचा कार्यक्रम २०२५ -२०२८**

अमर हिंद मंडळाच्या घटनेप्रमाणे सन २०२५ –२०२८ या तीन वर्षासाठी तीन विश्वस्त, अध्यक्ष, दोन उपाध्यक्ष आणि कार्यकारी समितीच्या ११ सभासदांची निवड करण्यात येणार आहे. कार्यकारी समितीने या वेळच्या निवडणूकीसाठी निर्णय अधिकारी म्हणून मा. शिवा पंडीत यांची नेमणूक केलेली आहे.

निवडणूक अधिकाऱ्यांच्या संमतीने निवडणुकीसंबधीचा नियम व अटींसहीत चा खालील कार्यक्रम सर्व तहहयात सभासदांच्या माहितीसाठी जाहीर करण्यात येत आहे.

१. मंडळाच्या घटनेप्रमाणे पुढील तीन वर्षासाठी विश्वस्त (३ जागा), अध्यक्ष (१ जागा), उपाध्यक्ष (२ जागा) आणि कार्यकारी समितीचे सभासद (११ जागा) यांची निवड करण्यात येईल.

२. वरील जागांसाठी भरावयाचे उमेदवारी अर्ज मंडळाच्या कचेरीत शनिवार दि. १९ जुलै ते मंगळवार दि. २२ जुलै २०२५ रोजी (रविवार दि. २० जुलै सोडून) सायंकाळी ७.०० ते ८.०० या वेळेत मिळतील. इच्छुक उमेदवारांनी प्रत्यक्ष येऊन सही करुन उमेदवारी अर्ज घेऊन जाणे बंधनकारक आहे.

३. पूर्ण भरलेले उमेदवारी अर्ज मंडळाच्या कचेरीत शुक्रवार दि. २५ जुलै २०२५ पर्यत वरील वेळेत स्विकारण्यात येतील. अर्ज दाखल करताना उमेदवाराने रोख रूपये १०००/– अनामत रक्कम तसेच आधारकार्ड व पॅनकार्ड सत्यप्रत आणणे आवश्यक राहील.

४. अर्जाची छाननी शनिवार दि. २६ जुलै २०२५रोजी सायंकाळी ७ वा. करण्यात येईल.

५. वैध उमेदवारांची यादी सोमवार दि. २८ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ७ वा. जाहिर करण्यात येईल.

६. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख व वेळ गुरूवार दि. ३१ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजेपर्यंत राहील. उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी उमेदवाराने लेखी अर्ज देणे आवश्यक राहील.

७. उमेदवारांची अंतिम यादी सोमवार दि. ४ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ७.०० वा. मंडळाच्या सूचना फलकावर लावण्यात येईल.

८. विश्वस्त, अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि कार्यकारी समितीचे सभासद यांच्या भरावयाच्या जागांपेक्षा अधिक उमेदवारी अर्ज आल्यास निवडणूक घेण्यात येईल.

९. निवडणूक रविवार दि. १० ऑगस्ट २०२५ रोजी होईल. निवडणुकीसाठी मतदान सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत गुप्तमतदान पद्धतीने मंडळाच्या जागेत घेण्यात येईल.

१०. मतदानास पात्र तहहयात सभासदांची यादी शनिवार दि. १९ जुलै ते २२ जुलै २०२५ (रविवार सोडून) या कालावधीत मंडळाच्या कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध असेल. ज्यांना यादी हवी असेल त्यांना रोख रू. १००/– भरून दिली जाईल.

११. मतदानासाठी पात्र असणारा प्रत्येक तहहयात सभासद ज्या पदांसाठी जितक्या जागा आहेत तितकी मते देवू शकेल. त्यापेक्षा अधिक मते दिल्यास ती मतपत्रिका बाद ठरविण्यात येईल.

१२. निवडणुकीसंबंधी कोणतीही तक्रार, तंटा, आक्षेप असल्यास तो लेखी स्वरुपात निवडणूक अधिकाऱ्यांकडे देण्यात यावा. या संबंधीचा निवडणूक अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम स्वरुपाचा असेल आणि तो सर्वांना बंधनकारक राहील.

दिनांक – ५ जुलै २०२५

सीमा कोल्हटकर
प्रमुख कार्यवाह

# अमर हिंद मंडळ, दादर

## मुंबई - ४०० ०२८

## ७८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

अमर हिंद मंडळाची ७८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. १० ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी २.३० वा. मंडळाच्या सभागृहात संस्थेचे अध्यक्ष श्री. भास्कर सावंत यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

सभेपुढील कामे :—

१. दि. २९ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२. सन २०२४ — २५ सालचा वार्षिक अहवाल मंजूर करणे.

३. सन २०२४ — २५ सालचा हिशेब व ताळेबंद मंजूर करणे.

४. सन २०२५ — २६ साठी हिशेब तपासनीस नेमणे व त्यांचे मानधन ठरविणे.

५. सन २०२५ — २८ या कालावधीसाठी ३ विश्वस्त, १ अध्यक्ष, २ उपाध्यक्ष आणि ११ कार्यकारी समिती सदस्य यांच्या निवडीसाठी झालेल्या निवडणुकीचा निर्णय जाहीर करणे.

६. माननीय अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे येणाऱ्या अन्य विषयांचा विचार करणे.

कार्यकारी समितीच्या अनुमतीने

सीमा कोल्हटकर
प्रमुख कार्यवाह

दिनांक : ५ जुलै २०२५

---

**सूचना :**

१) गणपूर्तीचे अभावी नियोजित वेळी सभा सुरु न करता स्थगित करण्यात येईल. ही स्थगित झालेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी दुपारी ३.०० वा. भरेल व अशी स्थगित सभा गणपूर्ती अभावी देखील पूर्णपणे वैध असेल.

२) सभासदांना अहवाल, हिशेब, अंदाजपत्रक संस्थेच्या कामकाजासंबंधी सभेत प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी मंडळाच्या कार्यालयात लेखी स्वरुपात आपले प्रश्न सोमवार दि. ०४ ऑगस्ट २०२५ पर्यंत सायं. ६ ते ८ यावेळेत (रविवार व्यतिरिक्त) सादर करावेत.

३) सभासदांनी आपले बदललेले पत्ते त्वरीत कळवावेत तसेच हयात नसलेल्या सभासदांच्या संबंधितांनी तत्संबंधीची माहिती कार्यालयात कळविण्याची कृपा करावी.

४) सर्वसाधारण सभेसाठी येताना कृपया आपले वैध ओळखपत्र बरोबर आणावे.

५) मंडळाचा अहवाल मंडळाच्या www.amarhindmandal.com या वेबसाईटवर उपलब्ध असेल. ज्या सभासदांना अहवालाची छापीलप्रत हवी असेल, त्यांना शुक्रवार दिनांक २५ जूलै २०२५ (रविवार सोडून) पासून मंडळाच्या कार्यालयात सायं. ६ ते ८ यावेळेत मिळेल.